'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या समस्या, शासनाचे प्रयत्न व उपाय योजना

**प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल**
**वाणिज्य विभाग**
**समर्थ महाविद्यालय, लाखनी**
**जि. भंडारा.**

महाराष्ट्रात १ मे १९९९ रोजी भंडारा जिल्हयाचे विभाजन करण्यात आले. त्यामुळे भंडारा व गोंदिया हे दोन नवे जिल्हे निर्माण झाले. भंडारा जिल्हयात भंडारा, मोहाडी, तुमसर, साकोली, लाखांदूर, पवनी व लाखनी हे ७ तालुके आहेत. जिल्हयाचे मुख्य स्थान व कार्यालय भंडारा हे आहे. महाराष्ट्र राज्याच्या नकाशात भंडारा जिल्हा महाराष्ट्र राज्यात पूर्व भागात आहे. भंडारा जिल्हयाच्या उत्तरेस मध्यप्रदेश राज्य आहे. पूर्वेश गोंदिया जिल्हा आहे. दक्षिणेस चंद्रपूर पश्चिमेस नागपूर व आग्नेयेस गडचिरोली जिल्हे आहेत.

भंडारा जिल्हयात विविध भुरुपे आहेत. भंडारा जिल्हा हा तलावाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. वैनगंगा व तिच्या उपनदयांनी जिल्हयाचा बहुतेक भाग व्यापलेला आहे. त्यामुळे हा भाग मैदानी आहे. भंडारा जिल्हा वैनगंगा नदीच्या खोऱ्यात आहे. जिल्हयात उत्तरेस आंबागडचे डोंगर आहे. मध्य भागात गायखुरी डोंगराचा काही भाग आहे.

सुजलाम सुफलाम जिल्हयात शेतकरी सुखी असला पाहिजे. 'राज्य शेतकऱ्यांचे', 'नेते शेतकऱ्यांचे' आणि 'सरकारही शेतकऱ्यांचे' अशा राज्यात शेतकऱ्यांच्या समस्या व त्यांच्या आत्महत्या 'आत्महत्याही शेतकऱ्याच्याच' केवढा हा विरोधाभास? शेतकरी समस्यामध्ये का आहे व तो आत्महत्या का करु लागला ! याचा शोध माध्यमांनी, कृषी तज्ञांनी, सामाजिक संस्थांनी, सरकारी समित्यांनी आणि राज्यकर्त्यांनी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

खेडेगावांचा हा भारत देश आणि त्या देशातला हा महाराष्ट्र ! आणि त्याच महाराष्ट्रातील भंडारा जिल्हयातला हा शेतकरी राजा, की जो समस्यांनी ग्रस्त होवून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. राजानेच आत्महत्या केली तर प्रजेचे काय? की प्रजा (आपण) राजावर अवलंबून असते. राजाने (शेतकऱ्यांने) अन्नधान्य पिकविले तरच आपण आपली अन्नधान्याची गरज पूर्ण करु. जर अन्नधान्य पिकविले नाही तर आपले काय होणार? केवढा हा विरोधाभास की ज्या विरोधाभासात आपला भंडारा जिल्हा जगत आहे. दारिद्रय किंवा गरीबी, चक्रवाढ दराने व्याजाची आकारणी, शेतीमालाला योग्य भाव न मिळणे, पाण्याच्या स्त्रोतांची कमतरता या सर्व गोष्टी मान्य केल्या तरी अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली की शेतकरी सहज आपले जीवन संपविण्याचा मार्ग पत्करतो आहे? त्याची अनेक कारणे असू शकतात. परंतु त्या अनेक कारणांपैकी काही महत्वाची ठोस कारणे खालीलप्रमाणे –

**निर्सगाचा लहरीपणा :**

शेती निर्सगावर अवलंबून आहे. पर्जन्यमानात सुसंगतपणा आढळून येत नाही. एका भागात अतिवृष्टी होते, तेव्हा दुसऱ्या भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. अतिवृष्टी आणि अवर्षण या दोन्ही परिस्थितीमध्ये पिके नष्ट होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. निर्सगाच्या या लहरीपणामुळे वेळेवर पाऊस न झाल्यामुळे शेतकरी हवालदिल होतो. परिणामी पेरणीच्या हंगामात घेतलेले कर्ज तसेच्या तसे त्याच्या डोक्यावर

राहते. पुन्हा आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी तो कर्ज काढतो. परिणामी त्याच्या कर्जात वाढ होते आणि त्याचा कर्ज बाजारीपणा वाढत जातो.

**सरकारी शेती क्षेत्रासाठी अत्यल्प गुंतवणूक :**

देशाचे शेती क्षेत्र राष्ट्रीय सकल उत्पन्नापैकी (जीडीपी) २५ टक्के भाग उचलते. या क्षेत्राशी संबंधीत लोकसंख्या जवळपास ७५ टक्के आहे. एकूण उत्पन्नापैकी बहुतांश भाग शेती करणाऱ्या लोकांच्या जीवनासाठी वापरण्यात येतो म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारातला भारताचा भाग एक टक्क्यापेक्षा कमीच असतो. 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस ' (टिस) संस्थेचा अहवाल म्हणतो – ''आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बॅकेच्या सुचनेनुसार सर्वच भारतीय सरकारांनी ग्रामीण विकासावर करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीत सतत घट केली आहे. यात शेतीसाठी खर्च, ग्रामीण विकास, विशेष क्षेत्र कार्यक्रम, जलयोजना, पूर नियंत्रण, ग्रामीण योजना, उर्जा व सार्वजनिक वाहतूक याचा समावेश होतो.''

केंद्र सरकार व राज्य सरकारे मिळून १९८५–९० मध्ये अशी गुंतवणूक/खर्च एकूण राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या (जीडीपी) १४.५ टक्के होता. तो २०००–०१ मध्ये ५.९ टक्केपर्यंत कमी झाला. ग्रामीण रोजगाराची प्रगती शुन्यावर आली. अन्नधान्याचा सद्याचा उपयोग (प्रती व्यक्ती) १९३९–४४ या काळात पडलेल्या दुष्काळाच्या काळातील उपभोगाच्या स्तरावर जावून पोहचला आहे, असे म्हणावे लागेल. ग्रामीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारांतर्फे करण्यात येणाऱ्या खर्चाचा स्तर टक्केवारीने १९८५–९० (जीडीपी) च्या पातळीवर जर पुढेही ठेवण्यात असता तर यावर होणारा खर्च २०००–०१ साली रु.१,२४,००० कोटी न राहता तो रु. ३,०५,००० कोटी झाला असता. एकूण झालेल्या खर्चाच्या तुलनेत तो अडीज पटीने जास्त झाला असता.

अहवाल पुढे म्हणतो १९८०–८१ च्या किमती कायम ठेवून शेती क्षेत्रासाठी करण्यात आलेली गुंतवणूक १९५०–५१ मध्ये रु.१,२६६ कोटी होती व ती १९७८–७९ मध्ये वाढून रु.५,२४६ कोटी झाली. परंतू १९७८–७९ नंतर त्यात घट होउन ती १९९०–९१ मध्ये रु.४,६९२ कोटी झाली. योजना आयोगातर्फे शेती क्षेत्रासाठी केलेल्या तरतुदीत तर प्रत्येक पंचवार्षिक योजनेनंतर काही अपवाद सोडता सतत घसरणच दिसून येते.

**खाजगी सावकाराकडून पतपुरवठा :**

राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या तुलनेत शेतीसाठी केलेली गुंतवणूक १.६ टक्क्यावरुन आता १.३ टक्के झाली आहे. १९९०–९१ साली सद्याचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग वित्तमंत्री म्हणून होते व भारताला जागतिकीकरणाला जुंपण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. १९९४–९५ पासून उपलब्ध माहितीच्या आधारे शेती क्षेत्राला एकूण रु.७८,००० कोटींची कर्जव्यवस्था आवश्यक आहे. त्यापैकी सर्व प्रकारच्या अधिकृत पतपुरवठा करणाऱ्या संस्थाकडून फक्त ११ टक्के भार उचलल्या जातो. याचाच अर्थ असा की जवळपास ९० टक्के कर्ज पुरवठा हा खाजगी सावकारांकडून या क्षेत्राला होतो. ही अतिशय धक्कादायक स्थिती आहे. ६० वर्षाच्या दिर्घ काळानंतरही या पतपुरवठा पध्दतीत सरकारातर्फे कोणताच बदल घडवून आणल्या गेला नाही. शेती क्षेत्राला सरकारी धोरणात किती गौण स्थान दिले जाते हे यावरुन सामान्यांनाही सहज समजू शकते. उद्योगाचे पारडे शेती क्षेत्राच्या मानाने अतिशय जड आहे. हेच यातून सिध्द होते.

**चुकीच्या सरकारी धोरणामुळे पिकांचे नुकसान :**

धान पिकाला रोग–जंतूपासून नुकसान सहन करावे लागते यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात औषधे, किटकनाशके खरेदी करण्यासाठी कर्ज काढावे लागते. इतके करुनही पिकांना

नुकसानीपासून वाचविता येत नाही. जास्त रसायनांचा व खतांचा वापर केल्याने शेत जमिनीची उत्पादन क्षमता सतत कमी होत असल्याचे दिसते. पिकांचे नुकसान होत असतांनाही रसायने व खते मोठया प्रमाणात वापरण्यात येतात.

याबाबत जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता असतांनाही सरकारी यंत्रणेकडून शेतकऱ्यांना कोणतीच मदत झाली नसल्याचे दिसून येते. त्याऐवजी ही रसायने व खते विकणाऱ्या कंपन्या व त्यांचे प्रतिनिधीच शेतकऱ्यांना जास्त प्रमाणातही खते वापरण्याबाबत माहिती देत असतात. औद्योगिक क्षेत्रातील वस्तूंचा खप वाढविण्याचाच यामागे प्रमुख उद्देश असतो यात शंका नाही. शेतकऱ्यांची श्रीमंती वाढविण्यास याचा उपयोग होतो असा उपप्रचार होत असताना सरकारतर्फे कोणतेही उपाय होत नसल्याचे दिसून येते.

मोठया प्रमाणात रासायनिक पदार्थांचा वापर केल्याने उत्पादन क्षमता तर कमी होतेच पण त्याशिवाय या जमिनीला भरपूर पाण्याची आवश्यकता भासू लागते. परंतू सरकारच्या धोरणानुसार अनेक भागात जलपुरवठा योजना अजूनही अपूर्णावस्थेत आहे. तसेच बहुतेक भागात शेतकरी पावसावर भरवसा ठेवून शेती करतात व त्यामुळे नापिकीला तोंड द्यावे लागून कर्जबाजारी होतात असे दिसून येते.

**शासनाचे प्रयत्न व उपाय योजना :**

महाराष्ट्रात विशेषत: विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी नेमलेल्या विशेषतज्ञ समितीच्या प्रकाशीत अहवालानुसार उत्पादनासाठी घेतलेल्या कर्जाचा अन्य कामासाठी केलेला खर्च, कर्ज देण्याच्या पध्दतीत अकार्यक्षमता याबाबतीत संस्थागत सुधारणा सुचविल्या आहेत.

मुक्त अर्थव्यवस्थेमुळे पूर्वीची बी—बियाणे तयार करण्याची शेतकऱ्यांची प्रक्रिया बंद पडली.

१. बियाणे निर्माण करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांचा पुरवठा व त्यातही बनावट बियाणांचा बाजारपेठेतील सुळसुळात यामुळे शेतकऱ्यांची उत्पादकता कमी झाली व त्यांचा कर्जाचा बोजा वाढला.
२. त्यासाठी पंचायत व ब्लॉक स्तरावर बियाणे प्रशिक्षण, खते व किटकनाशके प्रशिक्षण प्रयोगशाळा निर्माण करण्याची सुचना केली आहे.
३. बियाणे, खते, किटकनाशके यांच्या वाढत्या किमती, आंतरराष्ट्रीय खुली बाजारपेठ, आयात धोरणाचा परिणाम यासाठी ''दिलासा कोष'' ;डपजपहंजपवद थ्नदकद्ध निर्माण करण्यात यावा जेणे करुण भावातील चढउतार न्यूनतम किंमतीपेक्षा कमी किंमत असणे या कोषातून मदत देण्यात यावी.
४. या समितीने शेतकऱ्यांसाठी 'पे पॅकेज' जाहीर केले होते. त्याची नीट अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यावर टिका झाली आहे. पंतप्रधान मदतीनुसार देशातील ३१ जिल्हयासाठी हे पॅकेज २००८—०९ पर्यंत ठेवण्याची शिफारस केली.
५. नॅशनल रुरल एम्प्लायमेंट गॅरंटी प्रोगामचा संबंध जी पडीक जमीन लागवड योग्य करण्यासाठी करण्यात यावा त्यासाठी आंध्रप्रदेश धर्तीवर नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट अंमलात आणावे.
६. आंध्रप्रदेशच्या धर्तीवर स्वयंमदत गट या ३१ जिल्हयासाठी किंवा जे हलाखीचे जिल्हे आहेत त्यांच्यासाठी अंमलात आणावे. त्यासाठी विमन म्हणून सामुहिक गट प्रस्थापित करावे.
७. शेतकऱ्यांसमोरील भूमी अभिलेख शेतीसाठी कर्ज व शेतकऱ्यांशी संबंधीत सर्व व्यवहाराचे संगणकीकरणकृत रेकॉर्डची जरी शिफारस केली असली तरी बऱ्याचशा कार्यालयातील संगणक नादुरुस्त आहेत. अधिकाऱ्यांची मानसिकता बदलल्याशिवाय हे शक्य होणार नाही.

८. शेतकऱ्यांना स्वास्थावर खर्च करण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. त्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची सुधारण्याची गजगती वाढवावी लागेल तरच शेतकऱ्यांना स्वास्थ सेवा उपलब्ध होईल.

९. कृषी विभाग व कृषी विद्यापीठाच्या संशोधन व विस्तार कार्याचा बोजवारा वाजला आहे. त्याला पुन्हा सर्व शेतकऱ्यापर्यंत जोडण्याची आवश्यकता आहे. कृषी विद्यापीठ, कृषी अधिकारी, कृषी खंडविकास (कृषी) अधिकारी, ग्रामसेवकांपर्यंत याची सक्षम अंमलबजावणी केल्याशिवाय शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कितीही पॅकेजेस दिले तरी कमी होणार नाही. कारण अधिकारी व शेतकऱ्यांच्या मानसिकतेत आमुलाग्र बदल घडवून आणावा लागणार आहे. कारण ज्या कामासाठी कर्ज घेतले आहे त्या शेतीच्या कामासाठीच त्यांनी खर्च करावे यासाठी अन्य सामाजिक, व्यक्तीगत, कौटुंबिक, स्वास्थ याकडे वळता होणारा पैसा कर्जाचा बोजा वाढविणार आहे.

**सारांश :**

कर्ज केवळ शेतीच्या उत्पादकतेसाठीच न वापरता अन्य कारणांसाठी वापरले गेले. त्यासाठी त्यांची गरीबी कारणीभूत आहे. म्हणून घेतलेल्या कर्जाची उत्पादकता निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टीकोण निर्माण होण्याची त्यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. ती त्यांनी स्वत: बदलल्याशिवाय सरकारी पॅकेज हे फक्त तात्पुरते असतील.